आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३० वाजता
३०  डिसेंबर २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- २०४७ मधला विकसित भारत हीच भारताची धोरणप्रक्रिया आणि अर्थसंकल्पाची दिशा असायला हवी असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- राज्यातल्या महापालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपली, उद्या अर्जांची छाननी

- रेल-वन ॲपवरून अनारक्षित तिकिटं काढणाऱ्या सर्वांना १४ जानेवारीपासून ३ टक्के सवलत

- बांग्लादेशाच्या माजी प्रधानमंत्री खालिदा झिया यांचं निधन, डॉ. एस. जयशंकर उद्या अंत्यसंस्काराला उपस्थित राहणार

आणि

- श्रीलंकेविरुद्धच्या टी-ट्वेंटी मालिकेतल्या शेवटच्या सामन्यात भारतीय महिलांची फलंदाजी ढेपाळली

**<><><><><>**

२०४७ मध्ये भारताला विकसित करण्याचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवूनच  भारताची धोरणप्रक्रिया आणि अर्थसंकल्पाची दिशा असली पाहिजे असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीत अर्थसंकल्पपूर्व बैठकीत अर्थतज्ज्ञ आणि इतर क्षेत्रातल्या तज्ज्ञांना ते संबोधित करत होते. विकसित भारतासाठी आत्मनिर्भरता आणि रचनात्मक बदल ही या बैठकीमागची संकल्पना होती. विकसित भारताचं सरकारचं उद्दिष्ट जनसामान्यांमध्ये पोहोचल्याचं मोदी यावेळी म्हणाले.

अर्थतज्ज्ञांनी या बैठकीत उत्पादन आणि सेवा क्षेत्रातली उत्पादनक्षमता तसंच स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी विविध उपाय सुचवले. घरगुती बचत वाढवणे, पायाभूत सुविधांचा विकास आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यावर या बैठकीत चर्चा झाली.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण, नितीआयोगाचे अध्यक्ष सुमन बेरी तसंच अनेक अर्थतज्ज्ञ या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

२०२५ हे वर्ष हे जीवनमानातली सुलभता तसंच काम करण्यातली सुलभता यांची हमी देणाऱ्या शासकीय सुधारणांचं वर्ष होतं, असं प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांनी केलं आहे. नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. २०२५ मध्ये तीन रोजगार मेळावे भरवण्यात आले, त्यामधून वेगवेगळ्या मंत्रालयातली तसंच विभागांमधली दीड लाख नियुक्तीपत्रं देण्यात आली. यूपीएससीच्या प्रतिभासेतू या उपक्रमातून १३ हजार उमेदवारांची माहिती २८३ कंपन्यांना कळवण्यात आली आणि त्यांच्याकडून आलेल्या नियुक्त्या ४७१ उमेदवारांना देण्यात आल्या अशी माहिती या विभागाच्या सचिवांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

सरकारी नोकरीत समांतर भरतीची गरज आणि त्याचे परिणाम याविषयी संबंधितांशी विचारविनिमय सुरू आहे, अशी माहिती केंद्रीय कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाच्या सचिव रचना शाह यांनी आज नवी दिल्लीत दिली. समांतर पद्धतीने भरती केली तर अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीय उमेदवारांच्या आरक्षणाच्या हक्कावर गदा येत असल्याची टीका झाली होती. या संदर्भात मंत्रालयांशी चर्चा सुरु आहे, असं शाह म्हणाल्या.

समांतर पद्धतीने संयुक्त सचिव आणि उपसचिव किंवा संचालक दर्जाच्या पदांवर सुमारे ६० अधिकारी नेमण्यात आले. त्यातले ३० ते ४० अजूनही विविध विभागात सेवेत आहेत.

**<><><><><>**

२०२५ हे वर्ष भारतासाठी सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचं ठरलं. जगभरात भारताची वेगळी सांस्कृतिक ओळख निर्माण करण्यात यावर्षी देशाला यश आलं आहे. ऐकूया भारताच्या या वर्षातल्या सांस्कृतिक क्षेत्रातल्या वाटचालीविषयी…

***<u>होल्ड… व्हीसी</u>***

(मराठा सैन्यदलाचा इतिहास सांगणाऱ्या १२ किल्ल्यांचा समावेश या वर्षी युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळांच्या यादीत झाला, तसंच दिवाळी या सणानं युनेस्कोच्या अद्वितीय वारशाच्या यादीत स्थान मिळवलं. भारताच्या हस्तलिखितांचं जतन, डिजिटायजेशन आणि प्रसार करण्यासाठी ग्यान भारतम या उपक्रमाची सुरुवात यंदा झाली. लोकमाता अहिल्याबाई होळकर यांची तीनशेवी जयंती भोपाळमध्ये उत्साहाने साजरी

करण्यात आली, तसंच देशभरात यानिमित्त विविध कार्यक्रम झाले. भारताची आदिवासी आणि लोकपरंपरा अधोरेखित करणाऱ्या, यंदाच्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात सादर झालेल्या आणि ५ हजार कलाकारांचा सहभाग असलेल्या 'जयती जय मम भारतम' या कार्यक्रमाची नोंद गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये करण्यात आली. सरदार वल्लभभाई पटेल यांची दीडशेवी जयंती एकता दिवस म्हणून साजरी करण्यात आली आणि यानिमित्त विशेष नाणं आणि टपाल तिकिटाच्या अनावरणासह देशभरात विविध कार्यक्रम घेण्यात आले. तसंच, डॉक्टर श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या १२५व्या जयंती वर्षाची सुरुवातही यंदा झाली. याशिवाय, विठ्ठलभाई पटेल स्वातंत्र्यपूर्व भारताच्या लोकसभेचे पहिले सभापती झाल्याच्या घटनेला १०० वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्तानं यंदा राष्ट्रीय सभापती परिषद झाली.)

<><><><><>

अश्लील, बाल लैंगिक शोषणाशी संबंधित मानसिक आजाराचं चित्रण असलेल्या अथवा अन्य स्वरूपातल्या बेकायदा आशयाविरोधात कारवाई न करणारे ऑनलाईन प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडिया कंपन्यांविरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशारा केंद्र सरकारनं दिला आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं काल याबाबतच्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या.

सोशल मीडिया कंपन्यांनी आपल्या अनुपालन चौकटीचा तात्काळ आढावा घ्यावा, आणि आपल्या प्लॅटफॉर्मवरच्या अश्लील आणि बेकायदा आशयाविरोधात कारवाई करून तो त्वरित काढून टाकावा, असं यात म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. उद्या या अर्जांची छाननी होणार असून २ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. ३ जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप होईल, आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. येत्या १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होईल.

आज अखेरच्या दिवसापर्यंत अनेक ठिकाणी युती, आघाडी, उमेदवारी यादी यांचं चित्र स्पष्ट झालं नव्हतं. त्यामुळं राजकीय पक्ष आणि उमेदवारांसह मतदारांमध्ये संभ्रम होता. त्यामुळे अनेकांनी अखेरच्या दिवशी पक्षांतर करुन उमेदवारी पदरात पाडून घेतली.

<><><><><>

पश्चिम बंगाल सरकारमधला भ्रष्टाचार, कुप्रशासन आणि घुसखोरांचं लांगूलचालन यामुळे राज्याचा विकास थांबला आहे अशी टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज केली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी पोर्ट ब्लेअर इथं आझाद हिंद झेंडा फडकवला, त्या घटनेला ८० वर्षं पूर्ण झाल्याबद्दल कोलकाता इथं झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. महिला सुरक्षा आणि राज्यातून उद्योगधंद्यांचं स्थलांतर यासंदर्भातल्या पश्चिम बंगालमधल्या परिस्थितीबद्दल शाह यांनी यावेळी चिंता व्यक्त केली.

<><><><><>

रेल-वन ॲपवरून अनारक्षित तिकिटं काढणाऱ्यांना सर्वांना १४ जानेवारी ते १४ जुलै या कालावधीत ३ टक्के सवलत देण्याची घोषणा रेल्वे मंत्रालयानं केली आहे. सध्या केवळ आर-वॉलेटद्वारे तिकिटं काढणाऱ्यांना ३ टक्के कॅशबॅक दिला जातो. १४ जानेवारीपासून ही सवलत युपीआय, नेटबँकिंग, कार्ड पेमेंट करणाऱ्यांनाही मिळेल.

<><><><><>

युवा लेखकांना मार्गदर्शन करण्यासाठी पीएम युवा योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातल्या विजेत्यांची घोषणा आज झाली. इंग्रजीसह एकंदर २२ भारतीय भाषांमधल्या ४३ विजेत्यांचा यात समावेश आहे. मराठीसाठी दिव्यांशू सिंग, अंबादास मेव्हाणकर आणि प्रसाद जाधव या लेखकांना शिष्यवृत्ती मिळाली आहे. सर्व विजेत्यांच्या संकल्पनांचं पुस्तकात रुपांतर करण्यासाठी या लेखकांना सहा महिन्यांचं मार्गदर्शन आणि दर महिन्याला ५० हजारांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. याशिवाय पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर आयुष्यभरासाठी १० टक्के रॉयल्टी दिली जाणार आहे.

<><><><><>

बांगलादेशच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री खालिदा झिया यांचं आज सकाळी ढाका इथं निधन झालं. त्या ८० वर्षांच्या होत्या. दोन वेळा प्रधानमंत्री पदावर राहिलेल्या खालिदा झिया यांनी अनेक दशकं बांगलादेशच्या राजकारणावर आपला प्रभाव पडला, आणि बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचं अध्यक्षपद भूषवलं. बांगलादेशचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनूस यांनी खालिदा झिया यांच्या निधनाबद्दल देशात तीन दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे.

खालिदा झिया यांच्या पार्थिवावर उद्या अंत्यसंस्कार होणार आहेत. भारताकडून परराष्ट्रमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यावेळी उपस्थित राहतील.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बेगम खालिदा झिया यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. बांगलादेशच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री म्हणून, बांगलादेशच्या विकासात, तसंच भारत-बांगलादेश संबंधांमध्ये त्यांनी दिलेलं योगदान नेहमीच स्मरणात राहील, असं त्यांनी शोक संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेविरुद्धच्या टी-ट्वेंटी मालिकेतल्या अखेरच्या सामन्यात भारतीय महिला संघानं श्रीलंकेसमोर विजयासाठी १७६ धावांचं आव्हान ठेवलं आहे. तिरुवनंतपुरममध्ये सुरू असलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून श्रीलंकेनं क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. भारतीय डावाची सुरुवात खराब झाली. दुसऱ्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर सलामीवीर शफाली वर्मा बाद झाली. त्यानंतर टप्प्याटप्प्यानं भारतीय खेळाडू बाद होत राहिल्या. कर्णधार हरमनप्रीत कौरनं मात्र भारताचा डाव सावरला. ९ चौकार आणि १ षटकारच्या जोरावर तिनं ४३ चेंडून ६८ धावा केल्या. २० षटकात भारतीय महिलांनी ७ बाद १७५ धावा केल्या.

या मालिकेत भारताकडे सध्या ४-० अशी आघाडी आहे.

**//<><><><><>//**